dhansantosh123@gmail.com
मोबा. 9822107981

३२ संपूर्ण महाराष्ट्रात प्रसार पावलेले सातारी बाण्याचे प्रमुख साप्ताहिक

RNI NO.-54719/84

# धनसंतोष

■ संस्थापक | श्री. भाऊसाहेब नलावडे ■ संपादक | सौ. विमल नलावडे ■ PRN No. - STR/009/2015-2017

वर्ष ३२ वे | अंक ८ वा | शुक्रवार दि. २६|०६|२०१५ | २ रुपये

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव



डी. पी. भोसले कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांना निवेदन देताना अर्जुन कदम व कार्यकर्ते.

## आकरावी प्रवेश प्रक्रियेत ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राधान्य द्या

### कोरेगांव तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे निवेदन

कोरेगांव । आकरावी प्रवेश प्रक्रियेत कोरेगांव तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्राधान्यक्रमाने प्रवेश द्यावा अशी मागणी कोरेगांव तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अर्जुन कदम यांनी एका निवेदनाद्वारे डी. पी. भोसले महाविद्यालयाकडे केली आहे.

तालुका अध्यक्ष अर्जुन कदम यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने नुकतीच डी. पी. भोसले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांची भेट घेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या समस्यांचे एक निवेदन महाविद्यालयाला दिले.

निवेदन देतेवेळी तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे सोमनाथ बर्गे, सुनिल कदम, ओंकार वाघ, गणेश काशिद, अक्षय बर्गे, जितेंद्र कदम, राज कदम, अक्षय पवार, हर्षद शिंदे, अजिंक्य कदम, आकाश काशिद, अमर जगताप, निलेश जंगम, मनोज घनवट, आकाश घनवट, गंगाराम कोळी, गौरव घोरपडे आदींसह कोरेगांव तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी उपस्थित होते.

## डी. पी. भोसले कॉलेजमध्ये योग दिन साजरा

कोरेगांव । आजच्या धावपळीच्या युगात आपण आपल्या तब्येतीकडे म्हणावे असे लक्ष देत नसल्याने अनेक व्याधीने आपले जीवन ग्रासले आहे. नियमित योगासने केल्यास मानवी जीवन समृध्द तर होतेच शिवाय आयुष्यमानही वाढते असे प्रतिपादन सातारा जिल्ह्यातील पतंजली योग साधनेचे समन्वयक विजय तोट यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिन कार्यक्रमात विजय तोट बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते.

अध्यक्षीय प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत म्हणाले, प्राचीन कालखंडापासून चालत आलेल्या योग साधनेला अधिकच महत्व आहे. मानवी जीवन सुंदर आहे. याला जर योग साधनेची जोड दिली तर जीवनातील अनेक व्याधी कमी होवून आनंदी जीवन जगता येईल.

यावेळी विजय तोट, अभिजीत वेळापूरे, प्रा. अरुण पाटील यांनी योगाचे प्रात्यक्षीके दाखविले.

प्रास्ताविक प्रा. अरुण पाटील यांनी केले तर प्रा. दिलीप पवार यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.